# (जाहिरात क्रमांक - १ )

## जिल्हा निवड समिती, कोल्हापूर

## जिल्हा परिषद,कोल्हापूर कडील वर्ग - ३ मधील सरळसेवा पद भरती जाहिरात सन २०१०.

(शासन परिपत्रक क्रमांक.एपिटी - २००९/प्रक्र.३५२. आस्थापना - ८, दिनांकः १७ डिसेंबर २००९ मधील तरतूदीनूसार )

| अ क्र | पदाचे नांव | एकूण रिक्त पदे | अ. जा. | अ. ज. | वि जा अ | भ. ज. ब | भ ज क | भ. ज ड | वि. मा. प्र. | इ. मा. व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विस्तार अधिकारी (कृषि) | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ पैकी<br>१ महिला |
| २ | विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी २ वर्ग ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १<br>प्रकल्पग्रस्त |
| ३ | पर्यवेक्षिका | १८ | ३ पैकी<br>१ प्रकल्पग्रस्त<br>१ माजी सैनिक | ४ पैकी<br>१ प्रकल्पगस्त | ० | ० | ० | ० | ० | ३ पैकी<br>१ प्रकल्पग्रस्त<br>१ अंशकालिन | ८ पैकी<br>१ प्रकल्पगस्त<br>१ खेळाडू<br>१ अंशकालिन<br>१ माजी सैनिक |
| | | | पर्यवेक्षिका मधील रिक्त पदापैकी १ पद अपंगासाठी राखीव. | | | | | | | | |
| ४ | औषध निर्माता | ३ | ० | २ पैकी<br>१ प्रकल्पगस्त<br>१ महिला | ० | १<br>प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | आरोग्य सेवक (महिला) | ३५ | ० | १<br>भूकंपग्रस्त | ० | ० | २<br>प्रकल्पग्रस्त | १<br>प्रकल्पग्रस्त | ० | १८ पैकी<br>११ प्रकल्पग्रस्त<br>५ माजी सैनिक | १३ पैकी<br>१० प्रकल्पग्रस्त<br>२ खेळाडू |
| | | | आरोग्य सेवक महिला मधील रिक्त पदापैकी १ पद अपंगासाठी राखीव | | | | | | | | |
| ६ | आरोग्य सेवक (पुरुष) ५०% फवारणी | २७ | ७ पैकी<br>३ प्रकल्पग्रस्त | ० | ० | १<br>भूकंपग्रस्त | ० | ० | १ | ६ पैकी<br>२ प्रकल्पग्रस्त<br>१ खेळाडू<br>२ माजी सैनिक | १२ पैकी<br>२ प्रकल्पग्रस्त<br>२ माजी सैनिक |
| | | | आरोग्य सेवक (पुरुष) मधील रिक्त पदापैकी १ पद अपंगासाठी राखीव | | | | | | | | |
| ७ | कंत्राटी ग्रामसेवक | १३ | ३ पैकी<br>२ प्रकल्पग्रस्त<br>१ महिला | ३ पैकी<br>१ प्रकल्पग्रस्त<br>१ भूकंपग्रस्त | ० | ० | २ पैकी<br>१ प्रकल्पग्रस्त<br>१ माजी सैनिक | १<br>प्रकल्पग्रस्त | ० | २<br>प्रकल्पग्रस्त | २<br>प्रकल्पग्रस्त |
| ८ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | ८ | ० | २ पैकी<br>१ प्रकल्पग्रस्त<br>१ महिला | ० | ० | ३ पैकी<br>१ महिला<br>१ प्रकल्पग्रस्त | २ पैकी<br>१ प्रकल्पग्रस्त<br>१ माजी सैनिक | १<br>अंशकालिन | ० | ० |
| ९ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

- **पदाबाबतची माहिती :-**

| अ.क्र | पदाचे नांव | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता | प्रश्नपत्रिका दर्जा व स्वरुप |
|---|---|---|---|---|
| १ | **विस्तार अधिकारी (कृषि)** | ९३०० - ३४८०० + (४२०० ग्रेड पे) | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कृषि विषयक पदवी किंवा इतर कोणतीही अर्हता धारण करणे आवश्यक. परंतु, कृषि विषयातील उच्च शैक्षणिक अर्हता अणि कृषि विषयक कामाचा अनुभव किंवा कृषि पध्दतीचे व्यवसायाचे ज्ञान व ग्रामिण जीवनाचा अनुभव असेल अशांना अधिक पसंती देणेत येईल. व बी.टेक.(ॲग्री. इंजिनिअरींग) / यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाकडील कृषि व्यवसाय व्यवस्थापन पदविका २ वर्षे व बी.एस.सी.(कृषि / फलोत्पादन) ६ वर्षे. | मराठी १२वी दर्जा, मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी आणि पदासंबंधिच्या अर्हता ज्ञानावर आधारीत परिक्षा.<br>**(लेखी परिक्षा १८० गुण व मुलाखत २० गुण)** |
| २ | **विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी २ वर्ग ३** | ९३०० - ३४८०० + (४४०० ग्रेड पे) | बीएड पदवी (किंवा तत्सम शैक्षणिक अर्हता) धारण केल्यानंतरचा प्राथमिक किंवा माध्यमिक शाळातील अगर कनिष्ठ महाविद्यालयातील अद्यापनाचा कमीत कमी तीन वर्षाचा अनुभव किंवा , बीएड पदवी (किंवा तुल्य शैक्षणिक अर्हता) धारण केल्यानंतरचा प्राथमिक किंवा माध्यमिक शाळा तपासण्याचा कमीत कमी तीन वर्षाचा अनुभव | मराठी १२वी दर्जा, मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी आणि पदासंबंधिच्या अर्हता ज्ञानावर आधारीत परिक्षा.<br>**(लेखी परिक्षा १८० गुण व मुलाखत २० गुण)** |
| ३ | **पर्यवेक्षिका** | ९३०० - ३४८०० + (४१०० ग्रेड पे) | पदवीधर परंतु, एखाद्या संविधिक विद्यापीठाची समाजशास्त्र किंवा गृहविज्ञान किंवा शिक्षण किंवा बालविकास किंवा पोषण किंवा समाजशास्त्र या विषयातील स्नातक पदवी धारण केलेल्यांना अग्रक्रम. | मराठी १२वी दर्जा, मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी आणि पदासंबंधिच्या अर्हता ज्ञानावर आधारीत परिक्षा.<br>**(लेखी परिक्षा २०० गुण व मुलाखत २५ गुण)** |
| ४ | **औषध निर्माता** | ५२०० - २०२०० + (२८०० ग्रेड पे) | १२ वी उत्तिर्ण, शासनमान्य संस्थेतून डी.फार्मसी अभ्यासक्रम उत्तिर्ण व रजिस्ट्रेशन असणे आवश्यक. | महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परिक्षेला मराठी/इंग्रजी,सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयावरील व पदासंबंधिच्या अर्हता ज्ञानावर आधारीत परिक्षा.<br>**(लेखी परिक्षा १८० गुण व मुलाखत २० गुण)** |

| अ.क्र | पदाचे नांव | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता | प्रश्नपत्रिका दर्जा व स्वरुप |
|---|---|---|---|---|
| ५ | **आरोग्य सेवक (महिला)** | ५२०० - २०२०० + (२४०० ग्रेड पे) | एस.एस.सी.उत्तिर्ण, शासनमान्य संस्थेतून ए.एन.एम. कोर्स उत्तिर्ण. व महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल यांचे रजिस्ट्रेशन आवश्यक राहील. | महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परिक्षेला मराठी/इंग्रजी,सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयावरील व पदासंबंधिच्या अर्हता ज्ञानावर आधारीत परिक्षा. **(लेखी परिक्षा १८० गुण व मुलाखत २० गुण)** |
| ६ | **आरोग्य सेवक (पुरुष) ५०% फवारणी** | ५२०० - २०२०० + (२४०० ग्रेड पे) | भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र किंवा सामान्य विज्ञान विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र उत्तिर्ण व राष्ट्रीय मलेरिया प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून ९० दिवसाचा संबंधित जिल्हा हिवताप अधिकारी यांचे स्वाक्षरीचा अनुभवाचा दाखला आवश्यक राहील. | महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परिक्षेला मराठी/इंग्रजी,सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयावरील व पदासंबंधिच्या अर्हता ज्ञानावर आधारीत परिक्षा. **(लेखी परिक्षा १८० गुण व मुलाखत २० गुण)** |
| ७ | **कंत्राटी ग्रामसेवक** | मानधन रु.२५००/- दरमहा | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तिर्ण व कृषी पदवीका दोन वर्षाचा अभ्यासक्रम धारण किंवा कृषी पदवीधर, कृषी पदव्युत्तर पदवीधारक / बी.टेक.(ॲग्री. इंजिनिअरींग) व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाकडील कृषि व्यवसाय व्यवस्थापन पदविका / फलबागा उत्पादन पदविका / भाजीपाला उत्पादन पदविका / फुलशेती व प्रांगण उद्यान पदविका २ वर्षे आणि बी.एस.सी.(कृषि / उद्यानविद्या) ६ वर्षे. | महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परिक्षेला मराठी/इंग्रजी,सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयावरील व पदासंबंधिच्या अर्हता ज्ञानावर आधारीत परिक्षा **(लेखी परिक्षा १८० गुण व मुलाखत २० गुण))** |
| ८ | **स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक** | ५२०० - २०२०० + (२४०० ग्रेड पे) | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तिर्ण व **शासकीय तांत्रीक संस्थेकडून घेण्यात येणारा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक एक वर्ष मुदतीचा पाठयक्रम उत्तीर्ण किंवा वास्तूशास्त्रिय आरेखक किंवा बांधकाम पर्यवेक्षक किंवा आरेखक स्थापत्य पाठयक्रम उत्तीर्ण** | महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परिक्षेला मराठी/इंग्रजी,सामान्य ज्ञान व गणितशास्त्र, यंत्रशास्त्र, सर्वेक्षन, आरेखन व अंदाज ,बांधकाम आणि बांधकाम सामुग्री या विषयावरीलव पदासंबंधिच्या अर्हता ज्ञानावर आधारीत परिक्षा. **(लेखी परिक्षा १८० गुण व मुलाखत २० गुण)** |
| ९ | **कनिष्ठ सहाय्यक (लेखा)** | ५२०० - २०२०० + (१९०० ग्रेड पे ) | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तिर्ण अथवा तुल्य परिक्षा उत्तिर्ण आणि मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. किंवा टंकलेखनामध्ये ५०% गुण मिळवून माध्यमिक शालांत परिक्षा व तुल्य परिक्षा उत्तिर्ण. एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक. परंतु, इंग्रजी विषय घेऊन माध्यमिक शालांत परिक्षा अथवा तुल्य परिक्षा उत्तिर्ण इतर भाषेतील टंकलेखन अनुभव असलेल्या उमेदवारांस तसेच लेखा विषयक कामाचा पूर्व अनुभव असलेल्या उमेदवारांस अधिक पसंती. | महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परिक्षेला मराठी/इंग्रजी,सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयावरील व पदासंबंधिच्या अर्हता ज्ञानावर आधारीत परिक्षा. (लेखी परिक्षा २०० गुण) |

- **अर्ज सादर करणेचा कालावधी:**

| अ.क्र | पदांचे नांव | अर्ज स्विकारण्याचा कालावधी | प्रवेशपत्र वितरणाचा कालावधी | परिक्षेचा दिनांक व वेळ | अर्ज कोणाचे नांवे करावयाचा, |
|---|---|---|---|---|---|
| १ | **विस्तार अधिकारी (कृषि)** | **०५/०३/२०१० ते २५/०३/२०१०** | **०५/०४/२०१० ते १५/०४/२०१०** | **रविवार ०२/०५/२०१० सकाळी १०.०० ते ११.३०** | **सदस्य सचिव तथा - कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर** |
| २ | **विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी २ वर्ग ३** | **०५/०३/२०१० ते २५/०३/२०१०** | **०५/०४/२०१० ते १५/०४/२०१०** | **रविवार ०२/०५/२०१० दुपारी ०२.०० ते ०३.३०** | **सदस्य सचिव तथा - शिक्षणाधिकारी, (प्राथ.), जिल्हा परिषद, कोल्हापूर** |
| ३ | **पर्यवेक्षिका** | | | **०२/०५/२०१० दुपारी ०२.०० ते ०३.३०** | **सदस्य सचिव तथा - उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(बा.क.) जिल्हा परिषद, कोल्हापूर** |
| ४ | **औषध निर्माता** | **०५/०३/२०१० ते २५/०३/२०१०** | **०५/०४/२०१० ते १५/०४/२०१०** | **०८/०५/२०१० सकाळी १०.०० ते ११.३०** | **सदस्य सचिव तथा - जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर** |
| ५ | **आरोग्य सेवक (महिला )** | | | **०८/०५/२०१० दुपारी ०२.०० ते ०३.३०** | |
| ६ | **आरोग्य सेवक (पुरुष ) ५०% फवारणी** | | | **०८/०५/२०१० दुपारी ०२.०० ते ०३.३०** | |
| ७ | **कंत्राटी ग्रामसेवक** | **०५/०३/२०१० ते २५/०३/२०१०** | **०५/०४/२०१० ते १५/०४/२०१०** | **०९/०५/२०१० सकाळी १०.०० ते ११.३०** | **सदस्य सचिव तथा - उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.), जिल्हा परिषद, कोल्हापूर** |
| ८ | **स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक** | | | **०९/०५/२०१० दुपारी ०२.०० ते ०३.३०** | **सदस्य सचिव तथा - कार्यकारी अभियंता, (बांधकाम), जिल्हा परिषद, कोल्हापूर** |
| ९ | **कनिष्ठ सहाय्यक (लेखा )** | | | **१६/०५/२०१० दुपारी ०२.०० ते ०३.३०** | **सदस्य सचिव तथा - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर** |

- **टिप :-**

**अ)** समांतर आरक्षणामध्ये पात्र उमेदवार उपलब्ध न झालेस सदर पदे त्या-त्या प्रवर्गातून भरण्यात येतील

**ब)** पदांच्या संख्येत वाढ अथवा घट होवू शकतो. निवड यादी मध्ये नांव असले तरी नियुक्ती देणे बंधनकारक असणार नाही. वरील दर्शविणेतआलेली रिक्त पदे ही एप्रिल, २०११ अखेर रिक्त हेणाऱ्या पदांचा समावेश करुन दर्शविली आहेत. त्यामुळे निवड केलेल्या उमेदवारांना जस-जशी पदे रिक्त होतील त्याप्रमाणे नियुक्ती देणेत येईल.

**१) परिक्षा शुल्क:**

अनुक्रमणिका १ ते ९ पदाच्या परिक्षेकरीता असणारे **शुल्क मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.१००/-** व **खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी रु.२००/-** याप्रमाणे कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा व कोल्हापूर येथे देय असलेला रेखांकित डीमांड ड्राप्ट (धनाकर्ष) हा **मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद,कोल्हापूर** (Chief Accounts & Finance Officer, Z.P. Kolhapur) यांचे नांवे काढून अर्जासोबत जोडणेचा आहे. डी.डी. च्या मागे अर्जदाराने संपूर्ण नांव व पत्ता लिहणेचा आहे. परिक्षा शुल्क हे नापरतावा राहील.( **माजी सैनिकांना परिक्षा शुल्क लागू नाही** ). अर्जासोबत परिक्षा शुल्क डीमांड ड्राप्ट न जोडलेस अर्ज अपात्र केला जाईल.

**२) वयोमर्यादा:**

**अ)** सर्व पदांसाठी वयाची अट किमान १८ वर्ष व कमाल ३३ वर्ष आणि मागासवर्गीयांसाठी ३८ वर्ष राहील. तथापि, आरोग्य सेवक महिला पदाकरीता वय वर्षे ४० मर्यादा राहील. अपंग / माजी सैनिक / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त यांचेसाठी ४५ वर्ष व अंशकालिन साठी ४६ वर्षे आणि खेळाडूसाठी ५ वर्षे शिथील राहील. **उमेदवाराचे वयाची किमान व कमाल मर्यादा ही अर्ज करावयाच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच दि. २५/०३/२०१० अखेरच ग्राह्य धरणेत येईल.**

**३) सर्व पदाकरीता समान सूचना:**

**१.** राष्ट्रीयत्व - भारतीय तसेच उमेदवार हा महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा (डोमीसाईल प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक)

**२.** उमेदवाराने अर्जावर नमूद केलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचून अर्ज विहीत नमुन्यात परिपूर्ण भरणेचा आहे. अर्जावर उजव्या बाजूस **आयडेंटी साईज फोटो लावून तो राजपत्रित अधिकारी किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडून साक्षांकीत करावा.** अर्जा सोबत ४ बाय ९ सें.मी. आकाराचा लिफाफा हा रु.५/- चे पोष्टाचे तिकिट लावून व स्वतःचा पूर्ण पत्ता पिनकोडसह लिहून जोडावा. अर्ज हे संबंधित विभागामध्ये समक्ष स्विकारले जातील. पोष्टाव्दारे अर्ज पाठवितांना पाकीटावर ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचा ठळक अक्षरात उल्लेख करुन अर्ज पाठवावेत. पोष्टाव्दारे पाठविलेले अर्ज हे अर्जाचे अंतिम **दि. २५/०३/२०१०** पर्यंत सायंकाळी ५.४५ वा. पर्यंत प्राप्त झालेलेच फक्त स्विकारले जातील.

**३.** पात्र उमेदवारांना त्यांची लेखी परिक्षा प्रवेशपत्रे ही पोस्टाव्दारे त्यांनी अर्जासोबत जोडलेल्या पाकीटातून पाठविली जातील. प्रवेशपत्रे दि.२०/०४/२०१० अखेर प्राप्त न झालेस संबंधित विभागाकडे समक्ष संपर्क साधणेचा आहे.

**४.** शासकिय / निमशासकीस कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरणेचा आहे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

**५.** उमेदवार एकापेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करणार असलेस प्रत्येक पदासांठी विहीत नमुन्यात स्वतंत्र अर्ज करणेचा आहे व अर्जासोबत पदासाठी विहीत केलेल्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे कागदपत्रांच्या सत्य प्रती जोडणेच्या आहेत. मागासवर्गीय प्रवर्गातील पदासाठी अर्ज करतांना अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र अथवा जात प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. तसेच मुलाखतीसाठी पात्र ठरविणेत आलेल्या उमेदवारांनी मुलाखतीवेळी त्यांचे मुळ शैक्षणिक कागदपत्रे, जात वैधता किंवा जात प्रमाणपत्रासह व त्याच्या छायांकित / सांक्षांकित प्रतीसह हजर रहाणेचे आहे.

**६.** सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक बी बी सी - २००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब दिनांक : ५ नोव्हेंबर, २००९ नूसार मागासवर्गीय जात प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नियुक्ती दिली जाणार नाही

**७.** प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांनी सबंधित जिल्ह्यातील मा.जिल्हाधिकारी / जिल्हा पुनवर्सन अधिकारी यांचेकडील प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त प्रमाणपत्राच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडणेच्या आहेत. अन्यथा अर्ज अपात्र समजणेत येईल.

**८.** अशंकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या शासकीय अथवा निमशासकीय सेवेतील नियुक्त्यामध्ये ३ वर्षे पूर्ण अंशकालिन काम केलेल्या व रोजगार व मार्गदर्शन केंद्रामध्ये अनुभवाची नोंद केलेल्या सर्व अंशकालिन उमेदवार पात्र ठरतील. तसेच अशा उमेदवारांनी अनुभव प्रमाणपत्राची सत्य प्रत अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

**९.** अपंग आरक्षणातून लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी किमान ४०% अपंग असलेबाबत मा.जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा शासनाकडील तज्ञ वैद्यकिय मंडळाने दिलेले वैद्यकिय प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे. तसेच अपंग आरक्षणातून निवड केलेल्या उमेदवारांना शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकिय मंडळाने तो उमेदवार निवड केलेल्या पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिलेवरच नियुक्ती देणेत येईल.

**१०.** अपंग उमेदवारांच्या लेखी परिक्षेस लेखनिक घेणार किंवा उमेदवार स्वतः लेखनिकाची व्यवस्था करणार आहे याचा अर्जात स्पष्ट उल्लेख करावा तसेच अपंग भरतीचा क्रम **अ)** अंध/अल्पदृष्टी **ब)** कर्णबधीर/मुकबधीर **क)** अस्थिव्यंग असा राहील. जाहीरातीत नमूद केलेले अपंगाचे उमेदवार उपलब्ध न झालेस आंतर बदल करुन सुयोग्य उमेदवाराची निवड करण्यात येईल.

**११.** सेवा योजन कार्यालय , आदिवासी प्रकल्प अधिकारी , जिल्हा अधिकारी यांचे कडून प्राप्त होणा-या जनगणना अंशकालीन कर्मचारी प्रकल्पग्रस्त , माजी सैनिक , जिल्हा सैनिक कल्याण बोर्ड यांचे कडून शिफारस होणा-या उमेदवारांनी त्यांचे शैक्षणिक पात्रतेनूसार जाहीरातीप्रमाणे फी भरुन विहीत पदासाठी अर्ज करणे बंधनकारक आहे.

**१२.** शासन निर्णय दि.१३ जानेवारी २००९ नूसार अनुसूचीत जाती व जमाती वगळता विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांमधील उन्नत व प्रगत व्यक्ती / गट यामधील उमेदवारांनी सन २००८/०९ किंवा २००९/२०१० या आर्थिक वर्षातील प्रमाणपत्र सादर करणे किंवा प्रमाणपत्र काढणेसाठी केलेल्या अर्जाची पुराव्याची प्रत जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. त्याचप्रमाणे मुलाखतीवेळी उन्नत व प्रगत मोडत नसलेबाबतचे प्रमाणपत्र सादर न केलेस मुलाखतीस अपात्र ठरविण्यात येईल. सदरची अट ही खुल्या प्रवर्गातील खेळाडू उमेदवारांसाठी लागू राहील.

१३. खुल्या गटातील महिलांचे समातर ३०% आरक्षण उन्नत व प्रगत गटात न मोडण्याऱ्या (नॉन क्रिमिलेअर) महिलासाठी राहील. भ.ज. (क) (ड) व इमाव प्रवर्गातील सर्व उमेदवारांना (पुरुष, स्त्री) सदर आरक्षणाचा लाभ नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राचे आधारे मिळेल.

१४. मागास प्रवर्गातील महिला उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असेल तर त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेस खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवाराप्रमाणेच नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१५. शासन परिपत्रक क्रमाक पी आर इ २००४ / ३८५५/ प्राशि १.१ दि.२ जून २००५ नूसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसताना सैनिक सेवेत मृत्यु झालेल्या किंवा अपंगत्व येवून त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूबांतील फक्त जवानाची पत्नी किंवा अपंग जवानाची पत्नी यांना नियुक्ती देणेचे धोरण आहे. त्यानंतर त्याची अविवाहीत मुलगी / अविवाहीत मुलगा यांचा समावेश आहे. व त्यांचा १५% समांतर आरक्षणातून विचार करणेत येईल.

१६. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक १ जुलै २००५ नूसार लहान कुटूंब असलेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. (सोबत नमुना **प्रपत्र - अ** आहे )

१७. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय व शिक्षण व क्रिडा विभाग क्र.रक्रिधो-२०००-प्रक्र-६८-क्रियूसे-२ दि ३० एप्रिल २००५ मधील तरतूदीनूसार खेळाडूसाठी राखीव असलेल्या पदावर निवडीसाठी अर्हता पुढीलप्रमाणे असेल सदर पदासाठी त्या त्या खेळाच्या वैयक्तीक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम,व्दितीय,तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुंवर्ण ,रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू राज्य अजिक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलपिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य सघटनने आयोजित केलेल्या असाव्यात. तसेच राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये अंडर ऑफीसरची रॅंक मिळवून राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती. त्याचप्रमाणे भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय, शालेय स्पर्धेमध्ये प्रथम, व्दितीय, तृतीय स्थान प्राप्त करणारा खेळाडू. असे उपरोक्त नमूद केलेप्रमाणे खेळाडूच्या आरक्षित जागेसाठी पात्र ठरतील. खेळाडूच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरिता ज्या खेळाडूची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे संचालक क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे तपासणीसाठी पाठविणेत येईल व त्यानूसार नियुक्ती करण्यात येईल .

१८. अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत येईल. याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१९. लेखी परिक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना सदर पदासाठी घेण्यात येणा-या परिक्षेचे वेळापत्रक , परिक्षा केद्र , बैठक क्रमाक इ. बाबतची माहीती जिल्हा परिषदेच्या ज्या-त्या संबंधित विभागामध्ये उपलब्ध होईल

२०. नैसर्गीक आपत्तीमुळे विहीत दिनाकास लेखी परिक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्याप्रमाणे सोईच्या दिवशी लेखी परिक्षा घेणेत येईल. याबाबत सर्व उमेदवारांना वर्तमानपत्रातून जाहिरातीव्दारे कळविणेत येईल.

२१. एखादा उमेदवार त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून वगळणेत येईल

२२. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र अंनियो/ १००५/ १२६/ सेवा -४ दि.३१ ऑक्टोंबर २००५ नूसार भविष्य निर्वाह निधी व निवृत्ती वेतन नियम लागू होणार नाहीत.

२३. रिक्त पदाच्या संख्येत कमी जास्त बदल होण्याची शक्यता आहे त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदाची संख्या, समांतर आरक्षण यात बदल करणे, परिक्षा स्थगीत करणे / रद्द करणे , अंशतः बदल करणे इ. बाबतचे सर्व अधिकार हे जिल्हा निवड समिती, कोल्हापूर स्वतःकडे राखून ठेवत आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

**सही/-**
**सदस्य**
**जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

**सही/-**
**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी, कोल्हापूर**

**जिल्हा परिषद, कोल्हापूर.**
**अर्जाचा नमुना**

| |
|---|
| याठिकाणी उमेदवाराने अलिकडील काळातील आयडेंटी साईज फोटो लावावा व तो राजपत्रित अधिकारी किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडून साक्षांकीत करावा |

**प्रति,**
सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती कोल्हापूर
तथा ---------------------------------

जिल्हा परिषद,कोल्हापूर.

**भरती पदाचे नांव :-** ------------------------------------------

१) संपूर्ण नांव :- आडनांव ---------------------------- स्वत:चे नांव -------------------------------- वडीलांचे / पतीचे नांव ----------------------------

२) उमेदवाराचे नांवात बदल असलेस :- ---------------------------- -------------------------------- ----------------------------

३) पत्र व्यवहाराचा पत्ता :- ------------------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------------------ दूरध्वनी क्र.-

४) जातीचा प्रवर्ग
(योग्य ठिकाणी ( ✓) अशी खूण करावी.)

| अनु.जाती | अनु.जमाती | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड ) | वि.मा.प्र | इ.मा.व | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

५) आवश्यक त्या ठिकाणी ( ✓)अशी खूण करावी

| माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | महिला | अपंग | अंशकालिन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

६) अर्जदाराची जन्म तारीख (अंकामध्ये ) (शालांत प्रमाणपत्रा प्रमाणे)

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

७) अर्ज स्विकारणेच्या अंतिम दिनांकास दि.२५/०३/२०१० रोजी असलेले वय

| वय वर्षे | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

८) अनुसूचित जाती / जमाती वगळता वि.जा.भ.ज., वि.मा.प्र., इ.मा.व., मधील पुरुष व महिला तसेच खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवार उन्नत व प्रगत गटात मोडत असलेस / नसलेस याबाबत २००८/०९ किंवा २००९/१० या आर्थिक वर्षातील क्रिमिलेअर / नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र किंवा प्रमाणपत्र काढणेसाठी सादर केलेल्या अर्जाचा पुरावा जोडला आहे काय ? **होय / नाही**

९) महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात काय?**(डोमिसाईल प्रमाणपत्र जोडणे आवश्यक)** **होय / नाही**

१०) अर्जदार स्त्री आहे की पुरुष ? **( स्त्री ) / ( पुरुष )**

११) **अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशिल)**

| शैक्षणिक पात्रता | परिक्षा मंडळाचे नांव | उत्तिर्ण होण्याचे वर्ष | एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१२) नांव नोंदणी केलेल्या सेवायोजन कार्यालयाचे नांव ------------------------------------------------------------------------------------------------
नोंदणी क्रमांक ---------------------------------- व दिनांक / /

१३) **पूर्वानुभव असल्यास**

| अ.क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नांव | पद | कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

वर नमूद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचूक आहे. मी प्रमाणित करतो / करते की, अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आलेस अर्ज अपात्र करणेस, नोकरी गमाविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कार्यवाहीस पात्र व बांधिल राहीन.

ठिकाण :- अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक :- अर्जदाराचे संपूर्ण नांव :- ----------------------------------------------------

**टिप :- एसएससी व एचएससी परिक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र, कृषी पदवीका/पदवी परिक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र, नावातील बदला बाबत पुराव्याचे कागदपत्र,क्रिमिलेअर दाखला किंवा दाखला काढणेसाठी केलेल्या अर्जाची प्रत, जातीचे प्रमाणपत्र / जात वैद्यता प्रमाणपत्र, माझी सैनिक व अपंग उमेदवारांनी सक्षम प्राधिका-याचा दाखला इत्यादी. कागदपत्राच्या सत्यप्रती ह्या जाहिरातीमध्ये पदासाठी विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हता व अटीनूसार आवश्यक्यतेप्रमाणे अर्जासोबत जोडाव्यात अन्यथा अर्ज अपात्र ठरविणेत येईल. तसेच अंपग / अशंकालीन व खेळाडू आरक्षणामध्ये अर्ज केलेल्या उमेदवारांनी अर्जाच्या वरील भागावर लाल पेनाने ठळक अक्षरात खेळाडू / अपंग / अंशकालीन असे नमूद करावे**

# जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | |
|---|---|
| **जिल्हा परिषद, कोल्हापूर**<br>**विभाग :-** | **प्रवेशपत्र- २०१०**<br>अहस्तांतरणीय |
| उमेदवाराचे संपूर्ण नांव **:**<br><br>पदाचे नांव **:**<br><br>उमेदवाराची स्वाक्षरी<br><br>**खालील बाबी कार्यालयाने भरावयाच्या आहेत उमेदवारांनी भरु नयेत.**<br><br>**बैठक क्रमांक :**<br><br>**परिक्षा दिनांक व वेळ :**<br><br>**परिक्षा केंद्र :** | **याठिकाणी उमेदवाराने अलिकडील काळातील आयडेंटी साईज फोटो लावावा व तो राजपत्रित अधिकारी किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडून साक्षांकीत करावा.**<br><br>सदस्य सचिव तथा विभाग प्रमुख,<br>**जिल्हा निवड समिती, कोल्हापूर** |

---

**महत्वाच्या सूचना:**

१) उमेदवारांने ओळखपत्रावर विहीत केलेल्या ठिकाणी स्वाक्षरी करुन उजव्या बाजूस स्वत:चा अलिकाडच्या काळातील आयडेंटी साईजचा फोटो चिकटवून तो राजपत्रित अधिकारी किंव विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडून साक्षांकीत करावा.

२) परिक्षा केंद्रावर ओळखपत्रासह परिक्षा सुरु होणे पूर्वी एक तास अगोदर उपस्थित रहाणे आवश्यक. उशिरा येणाऱ्या व प्रवेश पत्र न आणणाऱ्या उमेदवाराला परिक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही. तसेच उमेदवाराने स्वत:चे फोटो असलेले ओळखपत्र उदा.वाहन परवाना, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र इ. सोबत आणणेचे आहे.

३) काळया रंगाचा बॉलपेन, लेखन पॅड इ. परिक्षा साहित्यच परिक्षा केंद्रावर आणणेचे आहे. पेन्सिलने सोडविलेली उत्तरपत्रिका ग्राह्य धरली जाणार नाही.

४) परिक्षा कक्षात उमेदवारांने लेखनसामग्री व्यतीरिक्त वहया, कागदपत्रे व इतर वस्तू, मोबाईल आदी उपकरणे, गणितीय उपकरणे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, ज्याने नक्कल / परिक्षेत गैरवापर करण्यास मदत होईल, अशा सर्व वस्तू आणता कामा नये. आणल्यास अशा वस्तू जप्त करुन परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

५) परिक्षेत कुठल्याही प्रकारची नक्कल वा अनुचित प्रकार चालणार नाही किंवा परिक्षा नियम भंग केल्यास सदर उमेदवारास परिक्षेस बसू दिले जाणार नाही. व त्याचेवर कायदेशिर कारवाई करणेत येईल. उमेदवारांना परिक्षेस बसवून घेण्याचा किंवा न घेण्याचा सर्वस्वी अधिकार हे परिक्षा प्रमुखांकडे राहतील.

६) परिक्षा वेळ संपले खेरीज कोणत्याही उमेदवारांस परिक्षा कक्ष सोडता येणार नाही. अन्यथा उत्तरपत्रिका रद्द समजणेत येईल.

७) लेखी परिक्षा मध्ये गुणवत्तेनुसार मुलाखती करीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची निवड यादी जिल्हाधिकारी कार्यालय,कोल्हापूर व जिल्हा परिषद,कोल्हापूर येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल. मुलाखती करीता पात्र ठरलेल्या उमेदवारांनी मुलाखती करीता हजर रहाणे करीता वेगळयाने कळविले जाणार नाही. मात्र निवड यादीवर कोणत्या तारखेस व कोठे मुलाखतीस हजर रहाणे या बाबत सूचना प्रसिध्द करणेत येतील. मुलाखतीसाठी दिलेल्या वेळेच्या एक तास अगोदर उपस्थित रहाणेचे आहे.

८) परिक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता तथा दैनिक भत्ता देण्यात येणार नाही.

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुबांचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाच्या नमुना - अ**

प्रतिज्ञापन

(नियम ४ पहा)

मी श्री. श्रीमती /कुमारी ------------------------------------------------------------------------------------------------------------

श्री.--------------------------------------------------------------------------- यांचा / यांची / मुलगा / मुलगी / पत्नी वय__________वर्ष____________

राहणार- --------------------------------------------------------------------------- याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करते /करतो की,

**१)** मी -------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

**२)** आज रोजी मला ___________ (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या-_________________आहे (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

**३)** हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनाक २८ मार्च, २००५ तदनंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे

ठिकाण

दिनांक / /२०१०

**अर्जदाराची सही**

अर्जदाराचे संपूर्ण नांव :- ------------------------------------------------------------------------------